# NSS Activity 2022-23

| | |
|---|---|
| **Event Title** | नेत्रदान श्रेष्ठदान व्याख्यान व निबंध स्पर्धा |
| **Organized BY** | राष्ट्रीय सेवा योजना विभाग,जिल्हा अंधत्व निवारण समिती , आपुलकी प्रतिष्ठान |
| **Date of Organization** | १५ सप्टेंबर २०२२ |
| **Funding Agency** | - |
| **Collaboration /MOU** | - |
| **Description** | नेत्रदान श्रेष्ठदान या विषयावर घेण्यात आलेल्या निबंध स्पर्धेत यश मिळालेल्या स्पर्धकांचा आपुलकी प्रतिष्ठान व जिल्हा अंधत्व निवारण समितीचे प्रमाणपत्र, सन्मानचिन्ह विविध मान्यवरांकडून पारितोषिके देऊन सन्मान करण्यात आला . सदर कार्यक्रमास राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला. |
| **Photographs** |  |

कटूसत्य
epaper.katusatyanews.com
16 Sep 2022 - Page 4

## नेत्रदान करुन अंधांना दृष्टी देण्याचे पुण्यकर्म करावे - प्राचार्य मधुसूदन बचुटे

### अंधत्व निवारण समिती, आपुलकी व सांगोला कॉलेजच्या निबंध स्पर्धेचा पारितोषिक वितरण संपन्न

सांगोला (कटूसत्य वृत्त):- नेत्रदान हे श्रेष्ठदान असून नेत्रदानासंदर्भात असलेल्या अंधश्रध्दा नाहीशा करण्यासाठी युवा वगार्ने पुढाकार घ्यावा व नेत्रदान करुन अंधाना दृष्टी मिळवून देण्याचे पुण्यकर्म करावे असे आवाहन प्राचार्य मधुसूदन बचुटे यांनी केले.

जिल्हा अंधत्व निवारण समिती, सोलापूर, आपुलकी प्रतिष्ठान सांगोला व राष्ट्रीय सेवा योजना, सांगोला महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने 37 व्या राष्ट्रीय नेत्रदान पंधरवडा निमित्त आयोजित करण्यात आलेल्या निबंध स्पर्धेच्या पारितोषिक वितरण समारंभात ते अध्यक्षपदावरुन बोलत होते. व्यासपीठावर सिव्हिल हॉस्पिटल नेत्रविभागाचे समुपदेशक विकास लिंगराज, सांगोला ग्रामीण रुग्णालयाच्या नेत्रतज्ञ डॉ. वंदना गवळी, आपुलकी प्रतिष्ठानचे अध्यक्ष राजेंद्र यादव, प्रा.डॉ. रमेश वुगड आदी होते.

प्राचार्य डॉ. मधुसूदन बचुटे म्हणाले, नेत्रदानासारखा विषय घेवून जनजागृती करण्याचे काम आपुलकी प्रतिष्ठानकडून केले जात आहे, आपुलकी प्रतिष्ठानने गेल्या अडीच वर्षापूर्वी देहदान, नेत्रदान व अवयवदान यासंदर्भात जनजागृती करण्यासाठी काढलेली रॅली ही कायम स्मरणात राहील. आपुलकीचे विविध क्षेत्रात सुरु असलेले सामाजिक कार्य व आपुलकीच्या माध्यमातून सुदृढ समाज बनविण्यासाठी सुरु असलेले कार्य विशेष कौतुक करण्याजोगे आहे. यावेळी बोलताना डॉ. वंदना गवळी म्हणाल्या की, नेत्रदानासंदर्भात युवापिढीने आसपासच्या लोकांचे समुपदेशन करुन नेत्रदानासाठी मृत व्यक्तींच्या नातेवाईकांना प्रवृत्त करण्याचे काम मनावर घेतले तर नेत्रदात्यांची संख्या वाढण्यास नक्कीच मदत होईल व नेत्रहीनांना ही सृष्टी पाहण्यासाठी मोलाची मदत होईल. मृत व्यक्तीच्या डोळ्याचा काही भाग आपण काढून घेत असतो. ज्याच्यामुळे चेहऱ्याला विद्रुपता येत नाही. आणि हे काम मृत्यूनंतर 6 (सहा) तासाच्या आत करावे लागते. तेव्हा आसपासच्या मृत व्यक्तीची माहिती आम्हास कळविली तर आम्ही त्यांच्या नातेवाईकांचे नेत्रदानाचे महत्व पटवून देवून नेत्रदान करण्यासाठी प्रवृत्त करु. व अंधांना नेत्ररोपण करुन त्यांना ही सृष्टी पाहण्याची संधी उपलब्ध करुन देऊ.

नेत्रदान पंधरवड्याचे औचित्य साधून प्राचार्य डॉ. मधुसूदन बचुटे यांनी नेत्रदान संकल्प केला. त्यांच्यासह सांगोला कॉलेजमधील मुलामुलींनीही मोठ्या प्रमाणात नेत्रदान संकल्प करुन फॉर्म भरुन दिले. यावेळी प्रा.डॉ. रमेश वुगड, अरविंद केदार, समुपदेशक विकास लिंगराज, यांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आपुलकी प्रतिष्ठानचे अध्यक्ष राजेंद्र यादव यांनी, सुत्रसंचलन कु. सानिका शितोळे हिने तर आभार प्रदर्शन प्रा.डॉ. बी.एस.गायकवाड सर यांनी केले. कार्यक्रमाला आपुलकीचे हरीभाऊ जगताप गुरुजी, प्रमोद दौंडे, अरविंद केदार, शरणप्पा हळ्ळीसागर, दादा खडतरे, रेल्वे स्टेशन प्रबंधक एस.एम. सिंह आदींसह सांगोला कॉलेजचे प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.

नेत्रदान श्रेष्ठदान या विषयावर घेण्यात आलेल्या या निबंध स्पर्धेत यश मिळविलेल्या स्पर्धकांना जिल्हा अंधत्व निवारण समितीचे प्रमाणपत्र, सन्मानचिन्ह, गुलाब फुलाचे रोप व आपुलकी प्रतिष्ठानच्या सदस्यांकडून रोख बक्षिसे देवून गौरविण्यात आले. या स्पर्धेत प्रथम क्रमांक - कु. मयुरी बाळू माने, द्वितीय क्रमांक- स्वप्ना दत्तात्रय खटकाळे, तृतीय क्रमांक सानिका नामदेव शितोळे, तर उत्तेजनार्थ क्रमांक ललिता रतनलाल चौधरी व वैष्णवी मोहन माळी यांनी पटकावला.